# सांगली कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगली

वसंतदादा मार्केट यार्ड, सांगली (महाराष्ट्र राज्य)

फोन नं. ०२३३-२६७०१४३, २६७१३६५ Email - apmc_sangli@rediffmail.com


जावक कमांक / ८७५ /२०२५-२६ सांगली, दिनांक - 13/1/2026

## अनुज्ञप्ती नुतणीकरण जाहीर परिपत्रक

सर्व संबंधीताना याव्दारे कळविणेत येते की, सांगली कृषि उत्पन्न बाजार समितीचे सन २०२५-२६ हे वर्ष ३१ मार्च, २०२६ रोजी संपत आहे. सन २०२५-२६ सालासाठी बाजार समिती मार्फत जाहीर केलेल्या मुख्य बाजार आवारात तसेच मिरज, कवठेमहांकाळ, जत व फळे व भाजीपाला मार्केट, सांगली येथील दुय्यम बाजार आवारात काम करण्यासाठी अडत्या, व्यापारी (अ वर्ग, ब वर्ग), प्रकिया करणारे (अ वर्ग, ब वर्ग), दलाल, तोलाईदार, हमाल, गाडीवान, मदतनीस, वखारवाला इत्यादीना कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगलीने अनुज्ञप्ती दिली आहे. याच उद्देशासाठी अनुज्ञप्तीधारकांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम ७ नुसार सन २०२५-२६ (दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६) या वर्षासाठी त्यांनी धारण केलेल्या अनुज्ञप्तीचे (लायसेन्सचे) नुतणीकरण करुन घेणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. तेंव्हा नविन वर्षाचे म्हणजे सन २०२६-२७ (दि.०१/०४/२०२६ ते दि.३१/०३/२०२७) ची अनुज्ञप्ती ही **दि.२८/०२/२०२६** चे आत भरुन नुतणीकरण करुन घ्यावे अन्यथा नियमानुसार दंड (लेट फी) आकारला जाईल. सदर नुतणीकरणासाठी बाजार समितीने विहीत केलेल्या नमुन्यातील अर्ज हा **माहे फेब्रुवारी, २०२६** मध्ये करावयाचा आहे.

तसेच सांगली कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगलीचे कार्यक्षेत्रात म्हणजे मिरज, क.महांकाळ, जत या तीन तालुक्यात शेंग, शेंगदाणा, हळद, गुळ, मिरची, कापूस (पिंजलेला), कापूस (न पिंजलेला), तूर, हरभरा, धणे, करडई, मुग, मटकी, उडीद, एरंडी, ज्वारी, बाजरी, गहू, मका, तंबाखू, भात (सडलेला व न सडलेला), तांदूळ, वाटाणा, मसूर, हुलगा (काळा व तांबडा), सुर्यफूल बी, सोयाबीन, खपली (तूस न काढलेला गहू), घेवडा बी (सर्व प्रकारचा घेवडा), तीळ, मोहरी, नारळ, चवळी, विडयाची पाने, बेदाणा, मसाल्याचे व इतर पदार्थ - आले, लसूण, चिंच इ.

**जनावरे -** गाय, बैल, म्हैस, रेडे, घोडे, शेळ्या, मेंढरे व बकरी व सर्व प्रकारची जनावरे.

**कांदा, बटाटा, लसूण इ. व सर्व प्रकारचे फळे, फळभाज्या, पालेभाज्या, सर्व प्रकारची फुले.**

वरील शेतीमाला संबंधी सांगली कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगलीचे कार्यक्षेत्रात वरील नियमीत शेतीमालाची जी एखादी व्यक्ती, पेढी अगर संस्था खरेदी अगर विक्री, दलाली, प्रकिया, तोल व इतर संबंधीत व्यवहार करीत असतील तर त्यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम ७ नुसार अनुज्ञप्ती घेणे हे बंधनकारक आहे. अनुज्ञप्ती शिवाय नियमीत शेतीमालाचा व्यवहार करणे ही बाब बेकायदेशीर असून गंभीर स्वरुपाची आहे व नियम क्रमांक ७ चा भंग करणारी आहे व हे कृत्य कलम ४६ नुसार फौजदारी गुन्ह्यास पात्र राहिल. बाजार समितीची अनुज्ञप्ती धारण न केलेल्या अडत्या, खरेदीदार व दलाल यांच्याशी व्यवहार केल्यास येणे देणे सवंधी तक्रार उदभवल्यास बाजार समिती जबाबदार राहणार नाही.

सदर नुतणीकरणासाठीच्या अनुज्ञप्तीसाठी बाजार समितीने विहीत केलेल्या नमुन्यातील अर्ज करावयाचा आहे. अर्जाचे नमुने कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगली मुख्य बाजार आवार व दुय्यम बाजार आवारांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील व तेथेच ते स्विकारले जातील त्याचा तपशील खालील प्रमाणे -




Scanned with OKEN Scanner

| अ.नं. | बाजाराचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १. | सांगली कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगली मुख्य बाजार आवार, सांगली | वसंतदादा मार्केट यार्ड, सांगली |
| २. | दुय्यम बाजार आवार, मिरज | शामराव बंडूजी पाटील दु. बा. आवार, मिरज |
| ३. | दुय्यम बाजार आवार, कवठेमहांकाळ | विठ्ठल(दाजी) पाटील दु. बा. आवार, कवठेमहांकाळ |
| ४. | दुय्यम बाजार आवार, जत | श्रीमंत विजयसिंहराव डफळे दु. बा. आवार, जत |
| ५. | फळे व भाजीपाला दुय्यम बाजार आवार, सांगली | विष्णूआण्णा पाटील फळे व भाजीपाला दु. बा. आवार, सांगली-कोल्हापूर रोड, सांगली. |

तसेच याव्दारे सर्व संबंधीताना कळविणेत येते की, ज्यांच्याकडून बाजार फी, देखरेख फी, प्लॉट भाडे, ट्रेडर्स कॉम्प्लेक्स भाडे, देखभाल आकार, जीएसटी कर, बिगरशेतसारा, अधिशुल्क इ. बाजार समितीला देणे असलेली सर्व रक्कम व इतर संबंधीत सर्व शासकीय कर बाजार समितीकडे भरणा करावी. तसेच थकबाकीदार असलेल्या अनुज्ञप्तीधारकांचे अनुज्ञप्तीचे नुतणीकरण करण्यात येणार नाही. तसेच **तसेच सन २०२५-२६ या सालाची बिले व शेतकरी हिशोबपट्टया सत्वर बाजार समिती, सांगलीकडे जमा करावीत. याशिवाय ज्या भागीदारी पेढींची नोंदणीकृत भागीदारीपत्र अद्याप बाजार समितीकडे सादर केलेली नाहीत त्या पेढीनी अनुज्ञप्ती नुतणीकरणापूर्वी भागीदारीपत्र (Partnership Deed) सादर करावे. तसेच ज्या पेढीनी यापूर्वी जी.एस.टी. नंबर घेतले आहेत त्यांनी सदरचे नंबर सादर करावेत, त्यामुळे जी.एस.टी. परतावा आपणांस मिळणे सोईचे होईल. तसेच अनुज्ञप्ती नुतणीकरण करतेवेळी फॉर्म सोबत वजनकाटा व वजनमापे वजनमापन नियंत्रक अधिकारी यांचे कडून प्रमाणित करून घेतले बाबतचे प्रमाणपत्र जोडणेचे आहे.**

**तसेच ज्या पेढींचे नांवे प्लॉट आहेत अशा पेढीनी त्यांचे प्लॉट व गाळया समोर मागे पुढे योग्य क्षमतेचे दिवस रात्र कव्हरेज असलेला सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसवून घ्यावी तसेच दुकानच्या दरवाजास सेंटर लॉक सिस्टीम बसवावी.**

**अनुज्ञप्तीकामी ज्या पेढी बैठक संमत्तीपत्र देतात अशा पेढीनी दि.०१/०४/२०२६ ते दि.३१/०३/२०२७ अखेरचे संमत्ती पत्र द्यावे.**

सबब सर्व संबंधीतानी कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधून दि. २८/०२/२०२६ पर्यंत त्यांनी बाजार समितीची देणे असलेली रक्कम भरणा करुन जरुर त्या सर्व बाबींची पूर्तता करुन आपल्या अनुज्ञप्तीचे नुतणीकरण करुन घ्यावे. तसेच ज्या व्यक्तींनी दि. २८/०२/२०२६ रोजी अगर यापूर्वी त्यांच्या पेढीचे अनुज्ञप्तीचे नुतणीकरण करुन घेतले नसेल अशा व्यक्तींनी / पेढींनी **दि.३१/०३/२०२६** नंतर सदर पेढीवर कोणतेही खरेदी विक्रीचे व्यवहार करू नयेत, जर विनाअनुज्ञप्ती खरेदी विक्रीचे व्यवहार केलेचे बाजार समिती, सांगलीचे निदर्शनास आलेस, सदरचे कृत्य कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची सर्व संबंधीतानी नोंद घ्यावी.

**(महेश पतंगराव चव्हाण)** **(रावसाहेब राजाराम पाटील)** **(सुजय अशोकराव शिंदे)**
**सचिव** **उपसभापती** **सभापती**

**सांगली कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगली**



Scanned with OKEN Scanner